संविधानापुरतेच नव्हे, बाबासाहेबांचे कार्य सर्वच क्षेत्रात प्रभावी : मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे >> पान 2

चंद्रपूर मनपात ई-ऑफीस प्रणाली कार्यान्वित >> पान 3

बाबासाहेबांनी संपूर्ण आयुष्य गोरगरिबांच्या उद्धारासाठी खर्च केले : आ.सिध्दार्थ खरात >> पान 4

**सुविचार**

प्रेम आणि आदर हे प्रत्येक नात्याचे आधार आहेत.


दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 242 ■ मंगळवार, दि. 15 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये; प्राजक्ता माळीची नवी पोस्ट चर्चेत

आतील पान

# बाबासाहेब हे आमचे राष्ट्रपुरूष!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

### चैत्यभूमी येथे अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : बाबासाहेब उत्तम प्रशासक होते. त्यांनी विकासाचा पाया रचला. त्यामुळे बाबासाहेब हे आमचे राष्ट्रपुरूष आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवार, १४ एप्रिल रोजी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी दिनी चैत्यभूमी येथे अभिवादन केले.**

यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, ‘‘जगभरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केली जाते आणि सगळीकडे तोच उत्साह पाहायला मिळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या संविधानामुळे आज आपण एकसंघ भारत बघतो आहे. त्याच संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाले असून आपण अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहोत.‘‘

‘‘हा देश तयार करण्यासाठी त्याचा पाया तयार करण्याचे काम बाबासाहेबांनी केले. तसेच चुकीच्या रुढीपरंपरांतून देशाला बाहेर काढत समता स्थापित केली. संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा समान अधिकार, संधीची समानता आणि प्रत्येकाची स्वप्न पूर्ण होऊ शकतील, असे संविधान त्यांनी आपल्याला दिले. बाबासाहेबांचे अत्यंत मेधावी असे छात्र जीवन राहिले. सातत्याने शिक्षण घेत असताना समाज उत्थानाचा विचार त्यांनी कधी सोडला नाही. त्यांनी केलेले समाजनिर्मितीचे कार्य अतुलनीय आहे,‘‘ असेही ते म्हणाले.



### संविधानाचा गाभा भगवान गौतम बुद्धांच्या विचारातून

‘‘संपूर्ण विश्वाला शांतीच्या आणि विचाराच्या जोरावर जिंकणाऱ्या भगवान गौतम बुद्धांचा विचार बाबासाहेबांनी स्विकारला आणि तोच विचार भारताच्या संविधानाच्या माध्यमातून आपल्याला पाहायला मिळतो. आपल्या संविधानाचा गाभा भगवान गौतम बुद्धांच्या विचारातूनच तयार झाला आहे. हा शाश्वत विचार रुजवण्याचे काम बाबासाहेबांनी केले. बाबासाहेबांना नमन करताना एकच संकल्प घेतला पाहिजे की, कुठल्याही परिस्थितीत संविधानिक मुल्यांपासून आपण दूर होणार नाही आणि भारताचे संविधान आपल्यासाठी सर्वोच्च असेल,‘‘ असेही त्यांनी सांगितले.

## अंबादास दानवेमुळे शिवसेना फुटली, हा काड्या करण्याचे काम करतो; चंद्रकांत खैरे संतापले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना उबाठा पक्षाचे नेते चंद्रकांत खैरे आणि अंबादास दानवेंमध्ये चांगलीच जुंपली आहे. या म ाणसामुळे शिवसेनेतील

अनेक लोक फुटले, असा थेट आरोपच चंद्रकात खैरे यांनी केला आहे. तसेच अंबादास दानवे मोठा झाल्यासारखा वागतो. शिवसेना मी वाढवली, हा काड्या करण्याचं काम करतो. या माणसानं काय केलं सांगा, असे थेट सवाल खैरेंनी केली आहे.

शिवसेना मी वाढवली आणि अंबादास दानवे काड्या करण्याचं काम करतो असंही खैरे म्हणाले आहेत. तर मला आमंत्रण बैठकीचं आमंत्रण नव्हतं, मला विचारायला हवं होंत या माणसाने काय केलं हे सांगा असा थेट सवालही चंद्रकांत खैरेंनी उपस्थित केला. दरम्यान, यासंदर्भात मी उद्धव ठाकरेंना सांगणार असून तक्रार करणार असल्याचंही खैरेंनी स्पष्ट केलं. दरम्यान खैरे ज्येष्ठ नेते आहेत त्यांना कारवाई करायचीय तर करू द्या असं प्रत्युत्तर दानवेंनी दिलंय. त्यामुळे शिवसेना उबाठा पक्षातच आता नव्या वादाला तोंड फुटलं आहे.

## उद्धव ठाकरेंचा पक्ष विनायक राऊत चालवतात, संजय घाडी यांचा आरोप, घाडी दांपत्याच्या पक्षप्रवेशामुळे शिवसेनेच्या दोन गटात आरोप प्रत्यारोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मागाठाणे विधानसभा मतदार संघातील शिवसेना (ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक संजय घाडी आणि त्यांच्या पत्नी उपनेत्या व प्रवक्त्या संजना घाडी यांनी ठाकरे गटाला जय महाराष्ट्र करीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर आता आरोप प्रत्यारोपांना ऊत आला आहे. ठाकरेंचा पक्ष आता माजी खासदार विनायक राऊत हेच चालवतात असा आरोप घाडी दांपत्याने केला आहे. तर ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनीही घाडी यांच्यावर आरोप केले असून संजना घाडी यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर कसे आरोप केले होते त्याच्या जुन्या चित्रफिती पुन्हा प्रसारित केल्या आहेत.

## रत्नागिरीतील दोन तरुणांची अखेर सुटका, पश्चिम आफ्रिकेत समुद्री चाच्यांनी केले होते अपहरण

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** समुद्री चाच्यांनी अपहरण केलेल्या सात भारतीय खलाशांसह रत्नागिरीतील दोन तरुणांची अखेर सुखरूप सुटका करण्यात आली आहे. पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावर काही दिवसांपूर्वी समुद्री चाच्यांनी जहाजाचे अपहरण केले होते. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील दोन तरुणांचा समावेश असून, त्यांच्या सुटकेम ुळे कुटुंबीयांसह संपूर्ण जिल्ह्याने सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ’एमव्ही बिटू रिव्हर’ नावाचे डांबर वाहतूक करणारे जहाज कॅमेरूनमधील डुआला बंदराकडे निघाले होते. पश्चिम आफ्रिकेच्या सागरी हद्दीत पोहोचल्यावर समुद्री चाच्यांनी जहाजावर हल्ला चढवून ते ताब्यात घेतले. यात जहाजावरील सात भारतीय खलाशांचे चाच्यांनी अपहरण केले होते. यामध्ये रत्नागिरी शहरातील भाटकरवाडा येथील समीन जावेद मिरकर आणि कर्ला येथील रेहान शब्बीर सोलकर या दोन तरुणांचा समावेश होता. इतर खलाशी तामिळनाडू आणि केरळ येथील होते. गेला महिनाभर हे सर्वजण समुद्री चाच्यांच्या कैदेत होते. या घटनेने रत्नागिरीतील मिरकर आणि सोलकर कुटुंबीयांवर चिंतेचे सावट पसरले होते.

## रायगडावरील घटनेची पुनरावृत्ती मुंबईत, दादा-भाईंना झटका, दोघांच्याही नाराजीच्या चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** महायुतीमध्ये सगळे काही आलबेल नसल्याच्या चर्चा सुरू आहेत. सत्ता वाटपापासून ते निधी वाटपामुळे महायुतीत वाद सुरू असल्याचे म्हटले जात आहे. तर, दुसरीकडे नेते मंडळींकडून ऑल इज वेल असल्याचा दावा केला जात आहे. महायुतीमध्ये नाराजीची तेढ वाढवणारी आणखी एक घटना समोर आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने आयोजित कार्यक्रमात दोन्ही उपमुख्यमंर्त्यांचे नियोजित भाषण रोखण्यात आले. या घटनेमुळे दोन्ही उपमुख्यमंत्री नाराज असल्याचे म्हटले जात आहे.

आज दादर येथील चैत्यभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली होती. हा शासकीय कार्यक्रम होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आदींसह इतर मंत्री, नेते मंडळी उपस्थित होते.

राजशिष्टाचारानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आधी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांचे भाषण नियोजित होते. नियोजित कार्यक्रमामुळे त्यांचे भाषण ही तयार होते. पण ऐन वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाषण करण्यापासून रोखण्यात आल आणि थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेच भाषण नियोजीत करण्यात आले.

चैत्यभूमीवरील अभिवादन सभेत राजशिष्टाचारानुसार भाषण नाकारल्याम ुळे दोन्ही उपमुख्यमंत्री नाराज असल्याची माहिती वरिष्ठ सूत्रांनी दिली. ऐनवेळी प्रोटोकॉल बदलणारा शुक्राचार्य कोण? याचा शोध घेणे सुरू आहे.दोन्ही उपमुख्यमंत्री कार्यालयातून शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अशा प्रकारे भाषण करू न देण्याचा प्रयत्न म्हणजे दोन्ही उपमुख्यमंर्त्यांचे खच्चीकरण करण्याचा डाव कोणाचा? याची चर्चा सुरू झाली आहे.

चैत्यभूमीवर झालेल्या प्रकारामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील नाराज झाले आहेत. त्यामुळेच त्यांनी कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर त्यांनी तात्काळ तिथून पाय काढला असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

किल्ले रायगडवर काय झाले?

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने दोन दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे रायगड किल्ल्यावर आले होते. त्यावेळी एक छोटेखानी कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात ऐनवेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाषणाची संधी देण्यात आली. तर, अजित पवारांनी ती संधी नाकारल्याचे म्हटले जात होते.म ुंबईत मात्र, दोन्ही उपमुख्यमंर्त्यांना भाषणाची संधी नाकारण्यात आल्याने चर्चांना उधाण आले आहे.

## एकनाथ शिंदे यांच्यानंतर आता अजित दादांचा नंबर

### ‘मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार’ हे पद म्हणजे त्यांच्या खात्यात घुसखोरी; रोहित पवारांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** महायुतीमध्ये काहीही आलबेल नसून अजित पवारांच्या अर्थ खात्यावरुन आमदारांची नाराजी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सातत्याने होते. त्यातच, गृहमंत्री अमित शाह यांच्या महाराष्ट्र दौऱ्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांची एकांतात भेट घेऊन अजित पवारांबद्दल नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात येते. अर्थ खात्याकडून निधीवाटप करताना शिवसेना आमदारांना वेगळी वागणूक दिल्याचं बोललं जात आहे.

त्यातच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मुख्य आर्थिक सल्लागर पद नव्याने तयार केलं असून त्यांचे खास मानले जाणाऱ्या प्रशांत परदेशी यांची या पदावर नेमणूक केली आहे. त्यावरुन, आता आमदार रोहित पवार यांनी महायुतीला लक्ष्य केलंय. तसेच, मुख्यमंत्र्यांनी अजित पवारांच्या अर्थ खात्यात घुसकोरी केल्याचा गंभीर आरोपच रोहित पवार यांनी केला आहे.

>> पान २

## भाजप भाकरी फिरविण्याच्या तयारीत, शेलारांच्या जागी मुंबई अध्यक्षपदासाठी फडणवीसांच्या निकटवर्तीय नेत्याचे नाव

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. मुंबईतील पक्षाची ताकद वाढवण्याच्या दृष्टीने भाजपने भाकरी फिरवण्याची तयारी सुरु केली असून, मुंबईतील सर्व आमदारांची आणि जिल्हाध्यक्षांची महत्त्वपूर्ण बैठक आज पार पडत आहे.

ही बैठक भाजपच्या मुंबई कार्यालयात सुरू असून, यात भाजपचे केंद्रीय सहसंघटन मंत्री शिव प्रकाश, राज्याचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, आणि मुंबई प्रदेशाध्यक्ष आशिष शेलार हे प्रमुख पदाधिकारी उपस्थित आहेत. पक्षाच्या संघटनात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी ही बैठक अत्यंत निर्णायक मानली जात आहे.

संघटनेत मोठे फेरबदल, आशिष शेलार यांची जागा प्रविण दरेकर घेणार?

या बैठकीदरम्यान, मुंबई भाजप संघटनेत लवकरच मोठे फेरबदल होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. मुंबई भाजप अध्यक्षपदासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय नेते प्रविण दरेकर यांचे नाव चर्चेत आहे. सध्या आशिष शेलार हे मुंबई अध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळत आहेत, मात्र आगामी महापालिका निवडणुकीसाठी संघटनेत नवसंजीवनी देण्यासाठी नेतृत्वात बदल केला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

प्रविण दरेकर हे अनुभवी आणि मुरलेले राजकारणी आहेत. तसेच मनसेमधून भाजपमध्ये आल्यानंतर ते देवेंद्र फडणवीस यांच्या अतिशय जवळ राहिले. फडणवीस यांच्या मर्जीतील नेते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्याकडे मुंबई पालिकेच्या निवडणुकीआधी काही महिने अध्यक्षपदाची सूत्रे देऊन काम करण्यास वेळ मिळावा, अशी भाजपची रणनीती असल्याचे सांगितले जाते.

मुंबई महापालिका ही देशातील सर्वात मोठ्या आर्थिक उलाढालीची महापालिका असून ही निवडणूक भाजपसह सर्वच पक्षांसाठी प्रतिष्ठेची ठरणार आहे. त्यामुळे भाजपने आधीपासूनच संघटनबांधणी आणि रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. पुढच्या काही महिन्यात मुंबई माहनगर पालिकेची निवडणूक होऊ शकते, असा अंदाज राजकीय तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

## अर्थचक्र मंदावणारा हवामान बदल

पर्यावरणात वारंवार होणारे बदल अर्थव्यवस्थेसाठी गंभीर संकट निर्माण करणारे ठरत आहेत. एखाद्या राष्ट्रावर ओढवलेले संकट हे संपूर्ण जगाच्या चिंता वाढवणारे ठरू शकते. त्यामुळेच जागतिक अर्थव्यवस्थेसाठी हवामान बदल हे काळजीचे प्रमुख कारण ठरताना दिसते. ही स्थिती रोखण्यासाठी जागतिक स्तरावर कठोर उपाययोजना करण्याची नितांत गरजेच्या! जागतिक तापमानात चार अंश सेल्सिअसने झालेली वाढ, या शतकाच्या अखेरीस जगातील ४० टक्के आर्थिक संसाधने नष्ट करु शकते, अशी भीती एका अहवालात नुकतीच व्यक्त करण्यात आली आहे. 'न्यू साऊथ वेल्स युनिव्हर्सिटी'च्या अहवालानुसार, जागतिक अर्थव्यवस्थेला तापमान वाढीचा सर्वांत मोठा धोका निर्माण झाला असून, त्यावर उपाययोजना या अत्यावश्यकच. जागतिकीकरणाच्या युगात तापमान वाढ, नैसर्गिक आपत्तींमुळे उद्भवलेले एखाद्या देशावर उद्भवलेले संकट हे संपूर्ण जगासाठी चिंता उत्पन्न करू शकते, ही बाब या अहवालात अधोरेखित करण्यात आली आहे. पुरवठा साखळी विस्कळीत झाली, तर संपूर्ण जगावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. जगातील कोणतेही राष्ट्र या धोक्यापासून सुरक्षित नाही, असेही या अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे. जागतिक तापमानात चार अंश सेल्सिअस वाढ झाल्याने जागतिक अर्थव्यवस्थेत ४० टक्के घट होईल, असा जो अंदाज व्यक्त करण्यात आला आहे, तो हवामान बदलाच्या अनियंत्रित आर्थिक परिणामांचे भीषण चित्र मांडणाराच म्हटला पाहिजे. याचा खोलवर विचार करता, 'पॅरिस करारा'च्या उद्दिष्टांचे गंभीर उल्लंघन हे यामागील एक कारण असल्याचे म्हणता येईल. संपूर्ण जगालाच हरितगृह वायू उत्सर्जन लक्षणीयरित्या रोखण्यात आलेले अपयश हे चिंता वाढवणारे आहेच. तापमानवाढीच्या या धोक्यामुळे आर्थिक मंदीला कारणीभूत ठरणारे अनेक घटक असू शकतात. अशा या हवामान बदलामुळे वारंवार घडणाऱ्या दुर्घटना अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडणाऱ्या ठरतात. उष्णतेच्या लाटा, दुष्काळ, पूर, भूकंप आणि वादळे अशा पर्यावरणीय घटना पायाभूत सुविधांचे थेट नुकसान तर करतातच, त्याशिवाय पुरवठा साखळीही विस्कळीत करतात. आताची म्यानमारमधील परिस्थिती हे त्याचे ज्वलंत आणि विदारक उदाहरण. त्याशिवाय कृषी उत्पादनांना हवामान बदलांचा थेट फटका बसतो. किनारी प्रदेशाला पूर आणि जमिनीची धूप अशा संकटांचा सामना करावा लागतो. परिणामी, लोकसंख्या मोठ्या संख्येने विस्थापित होते आणि मौल्यवान अशी जमीन नापीक होते. परिणामी, अन्न असुरक्षितता आणि संसाधनांचा तुटवडा भेडसावतो. मोठ्या प्रमाणात होणारे स्थलांतर, सामाजिक अशांतता आणि संघर्षांना कारणीभूत ठरते. त्यामुळे एकूणच अर्थव्यवस्था अस्थिरच्या गर्तेत घोंगावू लागते. आपत्ती निवारण आणि अनुकूलन उपायांच्या वाढत्या मागणीमुळे सार्वजनिक वित्तपुरवठ्यातही एकप्रकारचा तणाव निर्माण होतो. शिक्षण आणि आरोग्यसेवा यांसारख्या इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमधील संसाधने, निधी मग नाइलाजाने आपत्ती निवारणासाठी वळवलो जातो. केवळ आरोग्याचा विचार केला, तर वाढत्या उष्णतेशी संबंधित आजार, संसर्गजन्य रोगांचा प्रसार आणि कुपोषण यामुळे उत्पादकता लक्षणीयरित्या कमी होतेच, त्याशिवाय, आरोग्यसेवेसाठी मोठा खर्च होतो. एकूणच पर्यावरणाच्या संपूर्ण चक्राला जागतिक तापमानवाढीचे असहय्य चटके सोसावे लागतात. यातूनच संपूर्ण पर्यावरणीय परिसंस्था डळमळीत होते. पर्यावरणाचे चक्र अबाधित राहणे हे सर्वांच्याच हिताचे. त्याचप्रमाणे जगाचे आर्थिक चक्र सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी पर्यावरणाची कोणत्याही स्वरूपाची हानी होऊ न देणे, हेदेखील तितकेच गरजेचे. वारंवार घडणाऱ्या हवामान बदलांमुळे जैवविविधता, वनसंपदा, मत्स्यव्यवसाय अशा संसाधनांवर अवलंबून असलेल्या आर्थिक संधीही घटतात. त्यामुळेच हवामान बदलांची वाढती वारंवारता तसेच, तीव्रता सर्वच क्षेत्रांसाठी धोकादायक अशीच आहे. त्याचा थेट फटका अर्थव्यवस्थेला बसतो, तसेच तो सर्वांगीण अस्थिरतेलाही चालना देतो. या अहवालात वर्तवलेली जागतिक अर्थव्यवस्थेची ४० टक्के नुकसान ही टक्केवारी चिंताजनक अशीच असली, तरी त्याचा अर्थ नेमकेपणाने घेणे इष्ट ठरेल. यातून एक स्पष्ट संदेश देण्यात आला आहे आणि तो म्हणजे, हवामान बदलाबाबतची निष्क्रियता केवळ पर्यावरणासाठीच नव्हे, तर जागतिक अर्थव्यवस्थेसाठीदेखील मोठा धोका निर्माण करणारी ठरेल. अशा विनाशकारी आर्थिक भविष्याला रोखण्यासाठी व्यापक आणि महत्त्वाकांक्षी हवामान धोरण अमलात आणण्याची गरज यातून तीव्र झाली आहे, हे नक्की. जागतिक तापमानवाढ हा अर्थकारणावर गंभीर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक बनला असून, उद्योग, शेती, आरोग्य आणि व्यापार या सर्वच क्षेत्रांवर हवामान बदलाचा विपरीत प्रभाव जाणवत आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, पूर, दुष्काळ आणि चक्रीवादळे यामुळे उत्पादन क्षमता घटते, परिणामी जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसतो. वाढत्या तापमानामुळे कृषी क्षेत्र सर्वाधिक प्रभावित होत असून, दुष्काळ आणि अनियमित पावसामुळे अन्नधान्य उत्पादन घटले आहे. त्यामुळे अन्नधान्याच्या किमती वाढत असून, महागाई डोके वर काढत आहे. याचा थेट परिणाम ग्राहकांच्या क्रयशक्तीवर आणि एकूणच देशांच्या आर्थिक वृद्धीवर होताना दिसून येतो. औद्योगिक क्षेत्रावरही तापमानवाढीचा मोठा परिणाम दिसून येतो. ऊर्जा उत्पादनासाठी लागणाऱ्या नैसर्गिक स्रोतांची कमतरता, पुरवठा साखळीतील अडथळे, तसेच उत्पादन खर्च वाढल्याने कंपन्यांचे नफ्याचे प्रमाण घटते. पर्यटन उद्योगालाही मोठा फटका बसतो. जागतिक तापमानवाढ ही प्रामुख्याने हरितगृह वायूंमुळे होते. औद्योगिकीकरण, वनीकरणाचे नुकसान, जीवाश्म इंधनाचा वाढता वापर आणि वाढती लोकसंख्या यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड, मिथेन आणि नायट्रस ऑक्साईडसारख्या वायूंचे प्रमाण वाढते. हे वायू उष्णता शोषून घेतात आणि पृथ्वीचे सरासरी तापमान वाढवतात. यावर उपाय म्हणून नवीकरणीय ऊर्जास्रोतांचा अधिकाधिक वापर, जंगल संवर्धन, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब आणि कार्बन उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर कठोर धोरणे राबवण्याची गरज आहे. शाश्वत शेती पद्धती, इलेक्ट्रिक वाहने आणि हरित तंत्रज्ञानाचा वापर यामुळे तापमानवाढीवर नियंत्रण मिळवता येईल. गेल्या काही दशकांत वातावरणात मोठे बदल झाले आहेत. हिमनग वितळण्याच्या गतीत वाढ झाली असून, समुद्रपातळी वाढली आहे, तसेच हवामानातील अनिश्चितता देखील वाढली आहे. २०२३ हे साल आतापर्यंतचे सर्वांत उष्ण वर्ष ठरले. ऑस्ट्रेलिया, अमेरिका आणि युरोपमध्ये तापमानाने उच्चांक गाठला. अनेक ठिकाणी अति पूर आणि दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींचे प्रमाणही वाढले. ही स्थिती रोखण्यासाठी जागतिक स्तरावर कठोर उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे, अन्यथा भविष्यातील आर्थिक आणि सामाजिक स्थैर्य धोक्यात येईल, हे निश्चित!

# संविधानापुरतेच नव्हे, बाबासाहेबांचे कार्य सर्वच क्षेत्रात प्रभावी : मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे

## सामाजिक समता सप्ताहाचा उत्साहात समारोप

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** बाबासाहेबांचे कार्य केवळ संविधानापुरते मर्यादित नसून, ते अनेक क्षेत्रांमध्ये प्रभावी असून आजच्या काळातही दिशादर्शक असल्याचे मत यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी व्यक्त केले. भारताच्या सामाजिक समतेच्या वाटचालीत मूलभूत दगड ठरलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार आणि राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांची जनजागृती यासाठी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" जिल्ह्यात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. याच सप्ताहाचा समारोप १४ एप्रिल रोजी सामाजिक न्याय भवन येथे झाला. यावेळी ते बोलत होते.

तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या उपायुक्त शरद चव्हाण म्हणाले की, बाबासाहेब हे केवळ संविधान निर्माता नव्हते, तर ते आधुनिक भारताचे शिल्पकार होते. सामाजिक न्याय, बंधुता आणि समानता या मूल्यांची पायाभरणी त्यांनी केली. कोलंबिया विद्यापीठाने त्यांना 'द कोलंबियन्स अहेड ऑफ देअर टाइम' यादीत पहिल्या क्रमांकावर स्थान दिले हे त्यांचे जागतिक महत्व अधोरेखित करणारे आहे.आजही आपल्या समाजात 'इंडिया आणि भारत' या दोन टोकांच्या संकल्पना दिसतात. ही दरी भरून काढण्यासाठी संविधानाने दिलेल्या हक्कांची जपणूक करणे, व्यक्तीस्वातंत्र्याची जाणीव ठेवणे आणि प्रत्येक घटकास समतेच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. सामाजिक समतेची ही चळवळ आपण सर्वांनी स्वतःपासून सुरू केली पाहिजे. हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल." असे मत उपायुक्त शरद चव्हाण यांनी व्यक्त केले.

अनुसूचित जाती, जनजाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने ८ ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत जिल्ह्यामध्ये "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून उपायुक्त शरद चव्हाण, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, वाशीम; प्रमुख अतिथी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे,



राज्य सहसचिव पी. एस. खंडारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त गोपालराव आटोटे, शिवमंगल आप्पा राऊत, प्रकाश गवळीकर, वनमाला पेंढारकर; सहाय्यक आयुक्त एम. जी. वाठ, समाज कल्याण आदी मान्यवर उपस्थित होते.

तत्पूर्वी सकाळी ८.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या माहिती पुस्तिकेचे उपस्थित नागरिकांना वाटप करण्यात आले.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच सर्व मान्यवरांचे स्वागत भारताच्या संविधानाच्या उद्देशिका/प्रास्ताविका व डॉ. साळुंखे यांचे "सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध" आणि डॉ. जयसिंगराव पवार यांचे "राजर्षी शाहू छत्रपती" हे पुस्तक देऊन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून करण्यात आली. त्यानंतर प्रास्ताविकातून समाज कल्याण निरीक्षक स्वरांजली पाटील यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, वाशिम कार्यालयाद्वारे एकूण ४ विद्यार्थ्यांना प्रतिनिधीक स्वरूपात जात वैधता प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. समता सप्ताहांतर्गत रक्तदान केलेल्या एकूण १० रक्तदात्यांना प्रमाणपत्र देवून गौरवण्यात आले. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीत गायन केले.

प्रमुख वक्ते गोपालराव आटोटे यांनी महाडच्या सत्याग्रहाचे महत्त्व स्पष्ट करत सांगितले की, तो केवळ पिण्याच्या पाण्यासाठी नव्हता, तर सामाजिक समतेसाठी होता. त्यानंतर राज्य सहसचिव पी. एस. खंडारे यांनी बाबासाहेबांचा मानवमुक्तीचा लढा सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ लिपिक हरीश वानखेडे यांनी केले.तर, आभार तालुका समन्वयक स्विटी पर्वतकर यांनी मानले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील नागरिक, शासकीय वसतीगृह, निवासी शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच अनिल गायकवाड, व्यवस्थापक, स्मार्ट इंडिया प्रा. लि. कंपनीचे सर्व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. संपूर्ण सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी समाजकल्याण विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी पुढाकार घेतला.

## पीएनबी बँक घोटाळ्यातील फरार आरोपी मेहुल चोक्सीला अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील पंजाब नॅशनल बँक म्हणजेच पीएनबी घोटाळ्यातील फरार आरोपी आणि आर्थिक गुन्हेगार असलेल्या मेहुल चोक्सी संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. पीएनबी बँकेच्या कर्ज घोटाळ्यातील आरोपी आणि फरार हिरे व्यापारी मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये पोलिसांनी अटक केली आहे. इकॉनॉमिक टाईम्सच्या वृत्तानुसार, केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय)च्या अपीलवरून ६५ वर्षीय चोक्सीला शनिवारी (१२ एप्रिल २०२५) अटक करण्यात आलीय आणि तो अजूनही तुरुंगात असल्याची माहिती पुढे आली आहे. मेहुल चोक्सीने पंजाब नॅशनल बँकेकडून १३, ५०० कोटी रुपयांचा कर्ज घोटाळा केला होता आणि अटक टाळण्यासाठी तो भारतातून बेल्जियमला पळून गेला होता. येथे तो त्याची पत्नी प्रीती चोक्सीसोबत अँटवर्पमध्ये राहत होता. मात्र आता पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळत त्याला बेड्या ठोकल्या आहेत. पंजाब नॅशनल बँकेला १३ हजार ४०० कोटी रुपयांचा गंडा घालून मेहुल चोक्सी आणि घोटाळ्यातील मुख्य आरोपी असलेला त्याचा भाचा नीरव मोदी आपल्या कुटुंबासहसह देशातून पसार झाले होते. तपासयंत्रणेनं सन २०१८च्या फरार आर्थिक गुन्हेगार कायद्यानुसार मेहुल चोक्सीला फरार आर्थिक गुन्हेगार घोषित केलं आहे. अशातच आता मेहुल चोक्सीला अटक करताना, बेल्जियम पोलिसांनी मुंबई न्यायालयाने त्याच्याविरुद्ध जारी केलेल्या दोन अटक वॉरंटचा हवाला दिला असल्याची माहिती पुढे आली आहे. या अहवालात म्हटले आहे की, हे वॉरंट २३ मे २०१८ आणि १५ जून २०२१ रोजी जारी करण्यात आले होते. शिवाय पुढे असे म्हटले जात आहे की, मेहुल चोक्सी प्रकृती बिघडली असल्याने आणि इतर कारणांमुळे जामीनसह तात्काळ सुटकाही मागू शकणार असल्याची शक्यता आहे.

## आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये; प्राजक्ता माळीची नवी पोस्ट चर्चेत

**मुंबई/प्रतिनिधी :** 'जुळून येती रेशीमगाठी' या मालिकेतून घराघरांत पोहोचलेली लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी सोशल मीडियावर नेहमीच सक्रीय असते. नुकतीच तिने रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करणारी एक पोस्ट शेअर केली आहे, जी सध्या चर्चेत आहे. प्रादेशिक परिवहन विभागातर्फे दरवर्षी १ ते ३१ जानेवारी या कालावधीत 'रस्ता सुरक्षा अभियान' राबवण्यात येते. या अभियानांतर्गत प्राजक्ताने ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या बाईक रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. या अभियानाचे काही फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोंसोबतच तिने चाहत्यांना वाहतुकीचे नियम पाळण्याची कळकळीची विनंती केली आहे. "आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही, अशा पद्धतीने गाडी चालवली तर सगळेच सुरक्षित राहण्यास मदत होईल", असे तिने म्हटले आहे.

प्राजक्ताने शेअर केलेल्या एका फोटोत ती बाईकवर बसलेली दिसत आहे. मात्र, तिने हेल्मेट घातलेले नाही. याबद्दल स्पष्टीकरण देताना तिने तळटीपेत लिहिले आहे की, "फक्त फोटोसाठी बाईकवर बसलेय, वास्तविक मला अशा चालवताच येत नाहीत. त्यामुळे मी हेल्मेट लावले नाही." तसेच तिने "परवाह-काळजी" असा सल्लाही दिला आहे.

पान १ वरून...

## एकनाथ शिंदे यांच्यानंतर

मुख्यमंत्र्यांनी 'मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार' हे राज्यमंत्रिपदाचा दर्जा असलेले पद निर्माण करून एकप्रकारे अजितदादांच्या अर्थखात्यात देखील घुसखोरी केलेली आहे. यापुढे अर्थ खात्याचे सर्वच धोरणात्मक निर्णय आणि पर्यायाने सर्वच प्रशासकीय निर्णय सुद्धा मुख्य आर्थिक सल्लागारांच्या पर्यायाने मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत येतील. गेल्या अडीच वर्षात घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेत आधी एकनाथ शिंदे साहेबांच्या खात्यांमध्ये घुसखोरी केली आता अजितदादांचा नंबर आहे, असे रोहित पवार यांनी म्हटले. दरम्यान, महायुती भक्कम असून अर्थखात्याबद्दल कोणाचीही तक्रार नसल्याचे राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष आणि खासदार प्रफुल पटेल यांनी म्हटलं आहे.

विद्यमान मुख्यमंत्र्यांचा नेहमीच एकाधिकारशाहीकडे कल राहिला असल्याने त्यांनी प्रत्येक मंत्रालय प्रत्यक्ष-अपत्यक्षपणे आपल्या नियंत्रणात ठेवण्यावर भर दिला आहे. आता, मुख्य आर्थिक सल्लागार नेमण्याचा निर्णय देखील त्याच कार्यपद्‌तीचा भाग आहे. लोकशाहीत सत्तेचे विकेंद्रीकरण आणि टीम वर्कचा रिझल्ट नेहमीच केंद्रीकृत सत्तेपेक्षा चांगला राहिला आहे, त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी आपल्या कार्यपद्धतीत बदल करणे महाराष्ट्राच्या हिताचे राहील, असा सल्लादेखील रोहित पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना दिला आहे.

दरम्यान, राहिला प्रश्न मित्रपक्षांचा, तर भाजपच्या शब्दकोशात मित्रपक्ष म्हणजे केवळ 'तात्पुरती सोय' एवढाच अर्थ आहे, त्यामुळे गरज संपताच तात्पुरती सोय देखील संपवायची ही भाजपची कार्यपद्धती आहे. भाजपची ही कूटनीती बाहेर राहून सर्वांना कळत असली तरी शिकार होणाऱ्या मित्रपक्षांना शिकार होईपर्यंत कळत नाही हे मात्र मित्रपक्षांचं दुर्दैव म्हणावं लागेल, असेही रोहित पवार यांनी म्हटले.

# 'वनामकृवि'ने विकसित केलेल्या करडईच्या दोन वाणास देशपातळीवर मान्यता

**दैनिक आपला विदर्भ**

**परभणी/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अखिल भारतीय समन्वित करडई संशोधन प्रकल्प विभागाने करडई संशोधनात देशपातळीवर क्षेत्रवाढीस दोन नव्या करडई वाणांना अधिकृत मान्यता मिळवून दिली आहे. पीबीएनएस १५४ (परभणी सुवर्णा) व पीबीएनएस १८४ अशी या वाणांची नावे असून या वाणांना केंद्र सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या केंद्रीय पीक गुणवत्ता, वाण अधिसूचना व प्रसारण समितीच्या ९३ व्या बैठकीत मान्यता मिळाली आहे.

या वाणांना महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमध्ये (झोन-१) लागवडीसाठी शिफारस करण्यात आली असून, पीबीएनएस १८४ वाणाला झोन-२ अंतर्गत इतर प्रमुख करडई उत्पादक राज्यांमध्येही लागवडीसाठी मान्यता देण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांच्या मार्गदर्शनाखाली, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे, तसेच विद्यापीठ प्रशासनाच्या सहकार्याने हे यश प्राप्त झाल्याचे विद्यापीठाच्या वतीने काढण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. या वाणांमुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पादनक्षम व गुणवत्तापूर्ण करडई वाण मिळतील, ज्यामुळे त्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल अशी प्रतिक्रिया डॉ. इंद्र मणी यांनी दिली.

या वाणांचे बियाणे लवकरच राष्ट्रव्यापी स्तरावर उत्पादनासाठी व विक्रीसाठी उपलब्ध होतील, जे शेतकऱ्यांना नवे पर्याय उपलब्ध करून देतील असे संशोधन संचालक डॉक्टर खिजर बेग यांनी सांगितले. या वाणांच्या विकासामध्ये डॉ. एस. बी. घुगे, डॉ. आर. आर. धुतमल तसेच अखिल भारतीय समन्वित करडई प्रकल्पातील वैज्ञानिक व तांत्रिक कर्मचाऱ्यांचे याबाबतीत योगदान आहे.पीबीएनएस १५४ (परभणी सुवर्णा) या वाणाला ६ मार्च २०२३, तर पीबीएनएस १८४ वाणाला ३१ ऑगस्ट २०२२ रोजी अधिसूचित करण्यात आले होते. या नव्या वाणांचा प्रसार प्रभावीपणे करण्याचा विद्यापीठाचा संकल्प असून, हे वाण देशातील करडई उत्पादनामध्ये एक नवीन अध्याय उघडतील, असा विश्वास विद्यापीठ प्रशासनाने व्यक्त केला आहे.

पीबीएनएस १५४ (परभणी सुवर्णा)

पीबीएनएस १५४ (परभणी सुवर्णा) हा वाण १२४ ते १२६ दिवसांत परिपक्व होत असून याचे कोरडवाहू मध्ये उत्पादन १० ते १२ क्विंटल प्रति हेक्टर एवढे मिळते. या वाणाचे तेलाचे प्रमाण सुमारे ३०.९० टक्के असून, त्याला बाजारात चांगली मागणी आहे. या वाणाच्या विशेष वैशिष्ट्यांमध्ये मावा कीडीस प्रतिकारक्षमता, पानावरील ठिपके व मर रोगांवरील सहनशीलता आहे.

पीबीएनएस १८४

कोरडवाहू क्षेत्रात १२ ते १५ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन देणारा पीबीएनएस १८४ हा नवा वाण बागायती भागात १८ ते २० क्विंटल प्रति हेक्टर इतके उत्पादन देतो. या वाणामध्ये तेलाचे प्रमाण ३१.३ टक्के इतके असून, १२० ते १२४ दिवसांमध्ये परिपक्व होतो. यामध्ये विशेष बाब म्हणजे, मरउबळी रोगास व मावा कीडीस प्रतिकारक्षम, पानावरील ठिपके रोगास सहनशील आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## विविध वृत्त...

### स्व.पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम.एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांनी डॉ.आंबेडकरांनी समता, न्याय, बंधुता, समान हक्क आणि अधिकार संविधानामार्फत प्राप्त करून दिले असे विचार व्यक्त केले. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना डॉ.रमेश मोरे यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे बहुजनांच्या उद्धारासाठी कार्य करणारे थोर समाज सुधारक होते. त्यांनी जीवनव्यापी सर्वच क्षेत्रांमध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवण्याचे महान कार्य केले.असे मत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणातून बोलताना डॉ.आदिनाथ बदर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संपूर्ण कार्यकर्तृत्वावर ओझरता प्रकाश टाकल.याप्रसंगी मंचावर सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. प्रकाश हनवते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.केशव कोकाटे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. अमोल अढाव यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सिद्धार्थ इंगोले, प्रा.डॉ.आम्रपाली भगत यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :**जिल्हाधिकारी कार्यालयात आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### कु-हा येथे शॉट सर्किटने गोठ्याला आग लागुन सहा लाखांचे नुकसान; ट्रॅक्टरसह, ठिबक सिंचन व शेती उपयोगी साहित्याचे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील कु-हा येथिल युवा शेतकरी गजानन माणिकराव नागरे यांचे गट क्र. २२१२ मधील यांच्या शेतातील नुकसानाचा पंचा समक्ष पंचनामा शॉटसर्कीटने गोठ्याला आग लागुन शेतातील शेती उपयोगी साहीत्याचे सुमारे दोन लाखांचे नुकसान झाल्याचा पंचनामा पंचा समक्ष पंचनामा करण्यात आला.

गजानन माणिकराव नागरे यांच्या नावे मौजे कु-हा येथे गट. क्रमांक २२१२ मध्ये ४.७० हे. आर ऐवढी जमीन असुन त्यांनी हळदीचे पिक घेतले आहे. दि:-१२/०४/२५ रोजी अंदाजे २. वाजला शाँट सर्किट मुळे आग लागुन जलसिंचनासाठी वापरले जाणार सहित्या ठिबक सिंचन ८५ बन्डल, पाईप १०० नग असे अंदाजे ५९०,०००/- रोवढ्या रुपयांचे नुकसान झाले आहे.या घटनेचा पंचनामा गावातील पंचासमक्ष ग्राम महसुल अधिकारी पि.पी.राठोड यांनी केला आहे.

# बाबासाहेबांनी संपूर्ण आयुष्य गोरगरिबांच्या उद्धारासाठी खर्च केले : आ.सिध्दार्थ खरात



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : चैत्र महिन्यात जशी नवी पालवी फुटते व सर्वत्र बहार येतो. त्याचप्रमाणे चैत्र महिन्यातील बाबासाहेबांचा जन्म हा जीवनात चैतन्य व बहार आणणारी घटना आहे. बाबासाहेबांच्या जन्मामुळे गोरगरिबांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली आहे. त्यांच्यामुळेच गोरगरिबांच्या उद्धार झाला आहे.त्यांना सर्वच ठिकाणी आपले हक्क मिळाले आहेत.असे मत शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिध्दार्थ खरात यांनी व्यक्त केले. ते येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटीकेत भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बोलत होते.**

यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण केले. तसेच आ.सिध्दार्थ खरात यांची मुलगी डॉ. सांची चिंदरकर व जावई इंजीनियर सन्मित्र चिंदरकर यांनी सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना आ.सिध्दार्थ खरात पुढे बोलले की, यावर्षी मेहकर मतदारसंघात हवा वेगळी आहे. समता, ममता सोबत घेऊन मतदारसंघ चालत आहे. तुम्ही जो विश्वास, आशा, अपेक्षा माझ्या कडून व्यक्त केल्या आहेत. ते वाया जाणार नाही. जनतेच्या कल्याणासाठी, बाबासाहेबांच्या विचारावर प्रेम करणाऱ्या नागरिकांसाठी हातात हात घालून काम करायचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे भविष्य आहे. त्यांनी भारताच्या विकासाचा रोड मॅप आखलेला आहे. त्यांच्या विचारावर आपण काम केले तर, भारत जगात यशस्वी होईल. एवढी ताकद संविधानात आहे. त्याची पुरेपूर अंमलबजावणी व्हायला हवी. असेही आ.खरात म्हणाले.सकाळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी पंचशील मैदानात ध्वजारोहण केले.

नंतर पंचशील मैदान समता नगर येथे ध्वजारोहण व भाषण,मिलिंद नगर मध्ये ध्वजारोहण,भाषण,पैनगंगा नगर मध्ये डॉ. आंबेडकर प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण,पवनसुत नगर सह शहरातील अनेक ठिकाणी त्यांनी भेट देऊन डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले.

यावेळी सोबत काँग्रेसचे राज्य सरचिटणीस श्याम उमाळकर, उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, शहर प्रमुख किशोर गारोळे, काँग्रेसचे अनंतराव वानखेडे, शैलेश बावस्कर, माजी प्राचार्य डी.जी.गायकवाड, प्रा.ओम गजभीये, गजेंद्र माने,संजय वानखेडे,शिवसेनेचे संदीप गारोळे, संदीप गवई, सुरेश सरकटे, विजय सुरडकर,युवा सेनेचे ऋषी जगताप, रवी गीरी सह शिवसैनिक उपस्थित होते.



### बाबासाहेबांमुळे सर्वांना हक्क व अधिकार मिळाले

थोर समाज सुधारक, भारतीय घटनेचे शिल्पकार, अर्थतज्ञ, राजकीय धुरंदर यास गोरगरिबांच्या जीवनाचा उद्धार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले. बाबासाहेबांच्या कार्यामुळेच सर्वांना हक्क व अधिकार मिळाले. त्यामुळे गोरगरिबांचे शोषण थांबले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळाले. बाबासाहेबांच्या प्रेरणेने आज लाखो युवक शिक्षण घेत उच्च पदावर आहेत. देशासाठी काम करीत आहे. त्यांचे कार्य आजही प्रत्येक ठिकाणी प्रेरणा देणारे आहे. बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यात खस्ता खाल्ल्या मात्र, गोरगरीब कामगारांना न्याय मिळवून दिला. समाजातील सर्वांना समान न्याय देऊन त्यांना हक्क व अधिकार मिळवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेबांनी केले. त्यामुळे आज सर्वजण गुण्यागोविंदाने आणि आनंदाने जगत आहेत. असे मत आमदार सिद्धार्थ खरात यांनी यावेळी मार्गदर्शन करताना व्यक्त केले.



## शिवसेना जनसंपर्क कार्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** भारतीय घटनेचे शिल्पकार थोर समाज सुधारक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शहरातील शिवसेना जनसंपर्क कार्यालय येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी उपस्थित सर्व पदाधिकारी यांनी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी आमदार वसंत खंडेलवाल व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल उजळला दिला त्याबद्दल त्यांचे राजकीय सामाजिक यासह सर्वांगीण काम हे त्यानी जनतेच्या हितासाठी केले आहे त्यांच्या कार्यामुळेच आज देशाची वेगळी ओळख आहे त्यांनी लिहिलेली राज्यघटना आहे संपूर्ण जगात सर्वश्रेष्ठ आहे. त्यांनी सर्वांना हक्क मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक राजकीय कार्यावर प्रकाश टाकला.

## महापुरुषांचे विचार डोक्यात पेरा परिवर्तन निश्चित : प्रो.डॉ. गोपाल बछिरे



दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी :** महापुरुषांचे फोटो डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांचे विचार डोक्यात पेरा म्हणजे परिवर्तन निश्चित प्रो. डॉ. गोपाल बछिरे

चिंचोली सांगळे येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त कार्यक्रमात प्रो.डॉ. गोपाल बछिरे यांनी आपल्या प्रमुख भाषणात समाजाचे प्रबोधन करत आपले विचार मांडले. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता मुलक समाजाच्या निर्मितीची मुहूर्तमेढ रोवली व बाबासाहेब हे एका समाजाचे धर्माचे किंवा प्रांताचे नसून ते संपूर्ण विश्वाचे महामानव आहेत त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय दिला त्यामुळे ते सर्वांचे आहे आणि म्हणून कोलंबिया युनिव्हर्सिटीने त्यांना सिम्बॉल ऑफ नॉलेज ही पदवी प्रदान केली या याप्रसंगी शिवसेना उ.बा.ठा. चे लोणार शहर प्रमुख गजाननजी जाधव, युवा शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, युवा तालुका उपप्रमुख अमोल सुटे, यांनीही आपले विचार मांडले या कार्यक्रमासाठी चिंचोलीचे सरपंच पंजाबराव घुगे, उपसरपंच दशरथ कांबळे, भारतीय जनता पार्टी साहेबराव पाईकराव, ग्रामपंचायत सदस्य रवी सुटे, गजानन आघाव, रघुनाथ सांगळे, शेषराव सांगळे, दत्तात्रय जाधव, दिनकर कांबळे, सोनू सांगळे, आदी मान्यवरांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनकर कांबळे यांनी केले तर आभार सरपंच पंजाबराव घुगे यांनी मानले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मूलमंत्र आचरणात आणून सामाजिक बदल घडवा – जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील

### सामाजिक समता सप्ताह उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक ज्ञानाचे आणि प्रेरणा देणारे प्रतिक आहे. त्यांचे केवळ पुतळे न उभारता त्यांचे विचार, मूलमंत्र दैनंदिन जीवनात आचरणात आणून समाजात बदल घडविण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी आज येथे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयामार्फत सामाजिक न्याय भवन येथे सामाजिक समता सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. पाटील बोलत होते. या कार्यक्रमाला उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण, जिल्हा जातपडताळणी समितीचे संशोधन अधिकारी मनोज मेरत उपस्थित होते.




जिल्हाधिकारी डॉ. पाटील पुढे म्हणाले की, आजच्या ज्ञानाच्या युगामध्ये सक्षम होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या 'शिक्षण' हा मूलमंत्र दिला आहे. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान घेणे किंवा पुढचं शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करणे नाही. तर शिक्षण हा एक संस्कृतीचा, संस्काराचा भाग आहे. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची प्रगती साधावी आणि सामाजिक जीवनात बदल घडविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणाचा मूलमंत्र प्रत्येकाने आत्मसात करावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यावेळी बोलतांना केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, जिल्हा जातपडताळणी समितीचे संशोधन अधिकारी मनोज मेरत यांनीही मनोगत व्यक्त करुन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण यांनी केले.